आदर्श गावकरी

# प्रतिष्ठान महाविद्यालयात साहित्य अकादमीचे चर्चासत्र



**पैठण / प्रतिनिधी**

भारतात इंग्रजांनी आपली सत्ता राबवतानाच महत्त्वाच्या सुधारणा केल्या. असे मत प्राचार्य कौतिकराव ढाले पाटील यांनी व्यक्त केले. शनिवारी (दि.३०) साहित्य अकादमी चर्चा सत्राच्या वेळी केले तसेच इंग्रजांनी केलेल्या सुधारणांचा आढावा घेतला. स्वातंत्र्यचळवळीचे साहित्यात पडलेले प्रतिबिंब मांडले. यासाठी त्यांनी कुसुमाग्रज, म ाडखोलकर, साने गुरुजी यांच्या साहित्यातली अनेक उदाहरणे दिली.

प्रतिष्ठान महाविद्यालयात साहित्य अकादमीने चर्चासत्रेचे आयोजन केले होते. यावेळी ते बोलत होते. या उद्घाटनपर कार्यक्रमाचे अध्यक्ष साहित्यिक रंगनाथ पठारे यांनी स्वातंत्र्य आंदोलनाचे प्रतिबिंब कोठे आणि कसे पडले, त्यामागे लेखकाचा दृष्टीकोन कसा शोधता येतो हे सांगितले. कै. भाऊराव पाटील शिसोदे यांच्या स्मृती दिनाच्यानिमित्ताने त्यांच्या कार्याला उजाळा देत या चर्चासत्राची सुरुवात झाली. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष रवींद्र शिसोदे, सचिव राजेंद्र शिसोदे, प्रसिद्ध साहित्यिक राजन गवस, डॉ. सतीश बडवे, सुमती लांडे, एकनाथ पगार, महाविद्यालयाचे प्राचार्य सोनकांबळे, उपप्राचार्य प्रकाश तुरुकमाने, समन्वयक हंसराज जाधव, सर्जेराव जिगे, मधुकर बैकरे, निबंधवाचक, अभ्यासक, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. उद्घाटन सत्रानंतर झालेल्या दोन सत्रांमध्ये कवी रवी कोरडे, राजा होळकुंदे, डॉ. समीता जाधव, विनोद शिरसाट, दिलीप चव्हाण, सुशील धसकटे यांनी निबंधवाचन केले. या सत्रांचे अध्यक्ष जयदेव डोळे तसेच गणेश चंदनशिवे हे होते.

Auranagabad Edition
1 Aug, 2022 Page No. 6
Powered by : eReleGo.com